# कोण कसे खातो?





आपल्याला भूक लागली की आपण खातो.
हाताने घास उचलतो आणि तोंडात टाकतो.
आपण वाकून तोंड ताटाजवळ आणत नाही.
खायचा पदार्थ उचलून तोंडाजवळ नेतो.





प्रकाशक : विद्याभारती / इंडियन इन्स्टिटयूट ऑफ
एज्युकेशन, पुणे ४११०२९
© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४०० ००५,



हत्ती सोंडेने ऊस, गवत उचलतो. तोंडात हे पदार्थ टाकतो आणि खातो. वाकून पदार्थाला तोंड लावून खात नाही.

माकड हाताने चणे, केळे, भाकरीचा तुकडा उचलते आणि खाते. जमिनीवर चणे टाकले तर माकड एक एक चणा उचलून खाते. वाकून तोंड चण्याजवळ आणत नाही.



खार पुढच्या पायाने फळ उचलते. फळ तोंडाजवळ आणून कुरतडते.





पोपट एका पायात फळाचा तुकडा पकडतो. तो पाय उचलून चोचीजवळ आणतो आणि खातो.

खेकडा नांगीमध्ये किडे पकडतो. नांगी तोंडाजवळ आणतो आणि किडा खातो.



माणूस, हत्ती, माकड, पोपट, खार, खेकडा हे प्राणी हातापायांनी सोंडेनी पदार्थ उचलतात तोंडापर्यंत नेतात आणि खातात.

सगळे प्राणी असेच खातात का?

काही प्राणी हात, पाय, सोंड ह्यांनी पदार्थ उचलत नाहीत. ते पदार्थाला तोंड लावून खातात. अशा पाच प्राण्यांची नांवे लिहा.

१) ---------------- २) ---------------- ३) ----------------

४) ---------------- ५) ----------------

खाली काही प्राण्यांची नावे आहेत. त्यापैकी कोणते प्राणी खाली वाकून पाण्याला तोंड लावून पाणी पितात?

१) गाय २) कबुतर ३) माणूस ४) कुत्रा.